ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 4 | DECEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "धार्मिक धोरण दैववाद विषयक भूमिका"

**डॉ.संजय गायकवाड**
**विभाग प्रमुख, इतिहास , मा.ह.महाडिक महाविद्यालय, मोडनिंब.**

## प्रस्तावनाः



पृथ्वीवर संतानी आपल्या कार्याने जागृती व नवचैतन्य निर्माण केले. महाराष्ट्राची भूमी वीरांची, कलावंताची , संत महंताची कर्मभूमी म्हणून ओळखली आहे. या भूमीवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखामेळा यांनी आपल्या कार्याने संत मालिका तयार केली. या मालिकेत संत ज्ञानेश्वरांनी पाया घातला, नामदेवांनी त्याचा विस्तार केला. नाथांनी त्यावर इमारत बांधली, तुकारामांनी कळस बांधला, इतर संतानी कार्य सिध्दीस नेले. (पृष्ठ क्र.२३)[१] महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, गुजरात, गोवा या राज्यात नवचैतन्य निर्माण करणारे आगळेवेगळे संत म्हणजे गाडगेबाबा होय. विवेकवादी, बुध्दीप्रामाण्यवादी, मानवतावादी या विज्ञानवादी इ. दृष्टे संताने काम क्रोध, मद, मस्तर, दंभ, इत्यादीवर विजय मिळवून जितेंद्रीय झालेले समाजवादी संत, समाजक्रांतीचे अग्रदूत वैराग्याची मुर्ती स्थिप्रत नंददिप, मानवसेवा हिच ईश्वरसेवा मानणारे संताचे संत होते.

**चरित्र :** गाडगेबाबाचा जन्म वऱ्हाड प्रातांतील अमरावती जिल्हयातील दर्यापूर तालुक्यातील शेणगाव येथे २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव सखूबाई व वडिलाचे नाव झिंगराजी होते. गाडगेबाबाचे मुळ नाव डेबूजी झिंगराजी जाणोरकर असे होते. डेबूजींना वेगवेगळया प्रांतात वेगवेगळया नावाने ओळखले जात होते. वऱ्हाडात त्यांना डेबूजीबुवा किंवा वट्टीसाधू म्हणत, नागपूरात चाफरेबुवा, मद्रास व कोकणात गोधडेमहाराज, सातारा प्रदेशात लोटकेमहाराज, गोकर्णात चिंधेबुवा, पुणे, बडोदा, खानदेशात गाडगेमहाराज आणि निकटवर्तीय त्यांना नुसते बाबा म्हणत. (पृ.क्र..१३२ ते १३४)[२] गाडगेबाबा म्हणजे नितांत निरक्षर, अंगठा बहादुर आणि तरीही निष्णांत इंजिनिअर, कल्पक वास्तुशास्त्रज्ञ, अष्टावधानी व्यवस्थापक आणि सव्यासाचा समाजसेवक रयतेचा व मुक आणि मासुम पशुनाही बाहुपाशात कवटाळून घेणारा महासेवक असा जगावेगळा संत पृथ्वीतलावर स्वच्छतेचा दूत होता. (पृ.क्र.१३)[३]

**दैववाद :** हिंदू धर्म हा सनातन धर्म आहे. जगाच्या स्थैर्याचे अभ्युदयाचे आणि मोक्षाचे साधन म्हणजे धर्म असा हिंदू धर्मातील मुलभूत सिंध्दात आहे. सृष्टी निर्माण केल्यानंतर जीवांचा योग क्षेत्र चालावा त्यांना सदगती प्राप्त व्हावी आणि मोक्ष मिळावा म्हणून धर्माचा उपदेश परमेश्वर प्रत्येक सृष्टीत करीत असतो. हे सृष्टीचक्र अनादिकाळापासून चालू आहे. या चक्रातून पारमार्थिक विचारधारा पुढे आल्या. (पृ.क्र.२)[४] सर्वसाधारणपणे दैववादी विचारसरणीचा प्रभाव मोठया प्रमाणात मानवावर झालेला पहावयास मिळतो. मानव ज्यावेळी देवावर, नशीबावर, कर्मावर विसंबून राहून कोणत्याही घटनेच्या कार्यासाठी देवच कारण आहे असे गृहित धरतो, दैववादी लोक कर्तव्याला महत्व न देता नशिबाला, कर्माला महत्व देत देवावर विश्वास ठेवतात. दैववाद माणसाला असहाय्य व आगतिक बनवतो. विज्ञानाची थटा करीत अंधश्रध्देला जवळ करीत आधुनिक सुधारणेला विरोध करतो. आजही संपूर्ण समाजव्यवस्थेत दैववादाच्या नावाखाली लोकांना आपलसं करुन वेगवेगळया मार्गानी त्याचे शोषण केले जाते. त्यातूनच दैवाला प्रसन्न करण्यासाठी वेगवेगळया हिंसक व अहिसंक मार्गाचा वापर केला जातो.

**व्याख्या :** दैववाद म्हणजे मनुष्याचे सुखदुःख, यशापयश, सर्व नशिबावर अवलंबून असते. ---आदर्श शब्दकोश दैववाद म्हणजे देवालाच मुख्यकर्ता मानणारा भाग्याच्या भरवशावर राहणारा, आळशी, निरुपयोगी-मराठी शब्दसागर

**गाडगेमहाराजाचा धार्मिक दृष्टिकोन :** आपली भारतीय संस्कृती म्हणजे सम्यक आचार विचाराचा सुंदर अविष्कार आहे. सत्यमं शिवमं सुदरमं ही संस्कृतीची बिरुदे आहे. प्रेम, समता, बंधुता ही संस्कृतीची भूषणे आहेत. देव, धर्म, भक्ती, पुजा-अर्चा आणि अभिषेक इ. गोष्टी मानवाची प्रेरित भूक असून नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मानव नतमस्तक होतो. हा ईशकर्ता, मंदिर, मशिद, चर्चमध्ये राहतो का ? इतरत्र पहावयास मिळतो. खर तर तो वाऱ्यासारखा सर्वत्र आहे. तो माणसामाणसाच्या अंतकरणात राहत असतो. माणसाचा देह तर एक सुंदर मंदिर आहे. अनेक मंदिरे बांधून अस्वच्छ ठेवण्यापेक्षा आपले अंतकरण निर्मळ ठेवण्यातच खरा आनंद आहे. (पृ.क्र७८)[९] गाडगेबाबा म्हणजे महाराष्ट्रातील लोक शिक्षणाचे चालतेबोलते विद्यापीठ होय. विज्ञानाच्या समाजप्रबोधन करणारे खऱ्या अर्थाने लोकोत्तर महापुरुष होय. त्यांच्या रुपाने खऱ्या अर्थाने दाहक व क्रांतीकारक सत्यशोधक समाजवादी लाभला. बाबा किर्तनातून अध्यात्म सांगण्याऐवजी भौतिक समस्यावर बोट धरुन विज्ञान सांगत होते. बाबावर संत तुकाराम, संत कबीर यांच्या विचाराचा फार मोठा प्रभाव पडलेला होता. स्वच्छता म्हणजे गुलाबी प्रसन्नता, हिमनगाची सफेदता, नंदादिपाची स्वजळता, दवबिंदूची धवलता, सुर्याची सजेलता होय. स्वच्छता हेच परमेश्वराचे दुसरे नाव, खराटा श्रमाचे प्रतिक होता. श्रमातूनच स्वावलंबन, स्वावलंबानातून स्वाभिमान, स्वाभिमानातून आत्मोध्दार, आत्मोध्दारातून ग्रामोध्दार आणि ग्रामोध्दारातून समाजोध्दार हा बाबाचा खरा धर्म होता. (पृ.क्र.१११)[८]

**गाडगेमहाराजाचे देवाविषयक विचार :** गाडगेमहाराज देवाच्या दर्शनाला देवळात जात नसत. देव दगडात नसून माणसात आहे-
शेंदूर माखोनिया धोंडा । पाया पडमह पोरे रांडा ।। देव दगडाचा केला । गवंडी त्याचा बाप झाला ।। देव सोन्याचा घडविला । सोनार त्याचा बाप झाला ।। सोडेनिया खरा देवा । तरी मसोबाची पूजा ।।
गाडगे महाराजाना महार, मांग, चांभार, ढोर इत्यादीना लांब ठेवणाऱ्या देवाशी त्यांना कर्तव्य नव्हते. स्वच्छतेचा हाच त्याचा देव होता. (पृ.क्र.६४)[५]

गाडगेमहाराज नास्तिक नव्हते ते एकेश्वरवादाचे पुरस्कर्ते होते आणि सर्व धर्म मानणारे होते. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आणि इतर कोणत्याही धर्मात सांगितलेला देव एकच आहे. अशी त्यांची श्रध्दा होती. धर्म पाळणे याचा अर्थ कुठले कर्मकांड पाळणे हे गाडगेमहाराजाना अभिप्रेत नव्हते. ईश्वर हा मुर्तीत नाही. सर्व जगात आहे. म्हणून सर्व जगाची सेवा करा, गोरगरिबांची सेवा करा जनसेवा हिच ईश्वरसेवा माना. (पृ.क्र..३)[६] देव तिर्थात नाही, मूर्तीत नाही. रानावनात नाही. तो तुमच्या समोर, दरिद्रीनारायणच्या रुपात प्रत्यक्ष उभा आहे. त्याचीच जीवाभावाने सेवा करा, भुकलेल्या अन्न दया, तहानलेल्या पाणी दया, उघडया नागडयाला वस्त्र दया, बेघराला आसरा दया, बेरोजगाराला रोजगार दया, दुःखी, निराश झालेल्याना हिंमत दया, गरीब मुलाना शिक्षण करा, गरिबांच्या लग्नाला मदत करा, अंधपंगू रोग्याला औषध दया, मुक्या प्राण्याला अभय दया, हिच आहे देवपूजा आणि हयोच आहे रोकडा देवधर्म. (पृ.क्र.७६)[७] बाबानी देव माणसात पाहिला देवापुढे हात जोडून प्रार्थना करत बसण्यापेक्षा हातात खराटा घेवून सर्वत्र स्वच्छतेचा सुंगध पसरविला, देवाचा अभिषेक घालण्यापेक्षा महारोग्याला अंघोळ घालून अंगभर वस्त्रे दिली. देवापुढे मिष्टानाचा नैवेदय ठेवण्यापेक्षा हजारो भुकेकंगाल गरिबांना गोडधोंड जीवन दिले. देवाला भरजरी कपडयाने नटविण्यापेक्षा ऋणमोचनाला हजारो गरिबांना घोंगडी आणि बायकाना लुंगडी दिली. देवाची सुंदर मंदिरे बांधण्यापेक्षा ठिकठिकाणी रोगी आणि वारकरी लोकांच्या सेवेसाठी कोटयावधी रुपयाच्या धर्मशाळा बांधल्या गोरगरिबांची सेवा हिच खरी देवाची पुजा असे बाबा मानत होते. गरिबांची दुःखे दूर करत फिरणारे गाडगेबाबा हेच खरे देवदूत होते (पृ.क्र.७६,७७)[८] दगडाच्या देवाचे थोतांड माजवून चालत्या बोलत्या माणसांची उपेक्षा करणे हा काही धर्म नव्हे दगडी देवाची आराधना करणाऱ्यांची बाबा धिक्कार करीत होते. देवदेव म्हणणाऱ्यांची आणि एकाच गावात अनेक देवळे बांधणाऱ्यांची बाबा टर उडवित असत. अंधश्रध्देला मळलेल्या वाटा मोडून लोकांना सत्यसुर्याचे दर्शन घडविणे हेच बाबांचे युगप्रवर्तक कार्य होते. (पृ.क्र.२०)[९] बाबांनी लोकांच्या आंधळया भक्तीभावावर आघात केला. त्यांनी देवाच्या अस्तित्वाला फाटा दिला नाही. परमेश्वराला सर्वव्यापी स्वरुपात कैद करणाऱ्या वृत्तीला विरोध केला. आपला भक्तीभाव केवळ देवापुरता मर्यादित न ठेवता दिन-दलितापर्यंत तो व्यापक करावा. असा आग्रह धरला. प्रत्यक्षात देव कधी कुणाला भेटत नाही. स्वप्नात येत नाही, काही मागत नाही, शाप देत नाही, तुमचे भले व्हावे असे म्हणत नाही. माझ्यासाठी मंदिर बांधा, असे सांगत नाही. दूध, तुपाचा अभिषेक घाला असे म्हणत नाही. गंध फुले वाहिल्याने तो प्रसन्न होत नाही. (पृ.क्र.३९)[९] समाजाच्या सुखासाठी केलेल्या श्रमातून मिळालेली भाकरी हिच खरी देवाची चाकरी होते. समाज सुखासाठी श्रमातून घामाने डबडबलेल्या शरीर हाच देवाचा अभिषेक होता. श्रमसाधनातून केलेले काम म्हणजे हिच खरी देवाची महापूजा होती. हातातील कुदळ, फावडे म्हणजे श्रमसंस्कृतीच्या मंदिरातील टाळ-मृंदग होते. समाज सुखासाठी अविरत श्रमसाधना, हेच बाबाचे अभंग होते. बाबांनी श्रम आणि सेवा , श्रम आणि संस्कार, श्रम आणि पुजा, श्रम आणि अभिषेक, श्रम आणि अभंग, याची घातलेली सांगड म्हणजे समाज सुखातून ईश्वर भक्तीचा मार्ग प्रशस्त करण्यासारखे होते. (पृ.क्र.३६)[८]

**गाडगे महाराजांचे कर्मकांड विषयक विचार :** हिंदूस्थान हा फक्त कृषिप्रधान देश नाही तर देवपप्रधान ही आहे. दगडात देव प्रसन्न होणं असंभव आहे. उलट शेकडो वर्षापासून त्याची पुजा कर करुन भक्तांचे मनंही दगड बनले आहे. त्यातून माणुसकीचा पाझंर फुटण अशक्य आहे. भाविक माणसं मुर्तीपुरतेच आस्थिक असून आपल्या भावंडाच्या बाबतीत नास्तिक झाले आहेत. (पृ.क्र.१४)[३] यात्रा-जत्रा, तीर्थ, पुजा, पाठ, अशा कर्मकांडावर बाबांचा विश्वास नसे. दगडाला शेंदूर फासायचा त्याचा अभिषेक घालायचा, फुले वाहायची, नारळ फोडायचा आणि त्यांच्या

समोर बकरे,कोंबडे कापायचे असे केल्याने देव पावतो, प्रसन्न होतो. या चुकीच्या विचाराला त्याचा विरोध होता. देव कोणाला काही देत नाही. कोणालाही काही मागत नाही परंतू देवाच्या नावावर चाललेल्या माणसाचे व्यापार लोकभ्रम वाढवणारे आहेत. कोंबडया, बकऱ्याला कापल्याने देव रोगराई दूर करत नाही त्यासाठी गाव स्वच्छ ठेवा, शुध्द पाणी प्या. प्रसंगी डॉक्टरांचा सल्ला घ्या. (पृ.क्र१२)[९] महाराष्ट्रात जत्रेच्या नावाखाली कोंबडया, बकरी मारुन देवाला अभिषेक घालायचा. ढोंगी, स्वार्थी, दांभिक आणि हिंसाचारा लोक पाहून बाबांना संताप यावयाचा. ज्ञान-विज्ञान तंत्रज्ञानाचा पगडा असलेल्या आजच्या काळात देखील समाज दुधखुळा होवून बसला आहे. कर्मकांडाला ऊत येतो. अंधश्रध्देला बाळसे येते. चंगळवादाचे पीक वाढते. सारासारा विवेक बुध्दी लयास पोहचते. निसर्गचक्राला बाधा येते. कर्जबाजारीपणा वाढतो आणि माणुस दुखी होतो. (पृ.क्र.७८)[८] माणसाने आपल्या गरजेप्रमाणे देवाचे अनेक देव निर्माण केले. त्यांनी देवळे बांधली. त्यात देवाची दगडी मूर्ती बसविली. पुजा अर्चा सुरु केली. त्यासाठी पुजारी पुढे आले. त्यामुळे कर्मकांडाला ऊत आला. दगडी मूर्तीला महत्व प्राप्त झाले. माणसाला गौणत्व आले. खरा देव दगडाच्या किंवा सोन्या-चांदीच्या मूर्तीत कोंडता येत नाही. मंदिरात चार भिंतीत बंद करता येत नाही. बाबांनी माणसात देव पाहून माणसाच्या मनात खरे देवाचे ठिकाण असते. (पृ.क्र.६५)[९]

**गाडगे महाराजांचे अंधश्रध्दाविषयक विचार :** हिंदू धर्माचा ठेका तथाकथित उच्चशिक्षित हिंदू मध्ये दाने, देवदेवता, तीर्थयात्रा, याचाच प्रचंड बंड माजवून त्यांना देवखुळ नि धर्मवेडं बनवलं. दगड माती, धातूच्या मूर्तीचे भजन पुजन यातच जनतेला अडकवून भिकेला लावलं अन्न आसऱ्याला आचवलेल्या गरिबांसाठी काही तरतूद करण्याऐवजी देवदेवळाच्या उभारणीसाठी आणि ऐदी, बैरागी, गोसावी, भट, भिक्षुकांना निष्कारण पोसण्यासाठी अब्जावधी रुपयाचा चाललेल्या धर्मांध खैराती विरुध्द त्यांनी किर्तनातून आवाज उठविला. (पृ.क्र.१३,१४)[३]
घरातील रोगग्रस्त मुलांना औषध पाणी न देता लोक देवऋषीच्या अंगारा धुपारा का घेतात ? गावात प्लेगची साथ पसरली तर देवदेवताचा कोप झाला म्हणून कोंबडी, बकरी का कापतात ? श्रध्देच्या निमित्ताने आपल्या पूर्वजांना संतुष्ट करण्यासाठी भटजी मंडळींनां सुग्रास जेवण का देतात ? मुल व्हावे म्हणून देवाला नवस का करतात ? आपली इच्छा आकांक्षा पूर्ण व्हाव्यात म्हणून सत्यनारायणाची पुजा का घालतात. ? (पृ.क्र.३४)[८] समाजातील अंधश्रध्दाच माणसाच्या मागासल्यापणाला कारणीभूत आहेत. माणसाला नियतीशरण बनविते. दैववादी बनविते. दैववाद माणसाला असहाय्य बनवितो. मति खुंटवितो, बुध्दी गहाण ठेवतो. सुधारणा अडवितो. विज्ञानाची थटा करतो. परिणामी माणूस अंध्दश्रध्देला शरण जातो. या गोष्टीमुळे मानवाचे पाय जखडले जातात. हात बांधले जातात. ओठ शिवले जातात. म्हणून धर्माच्या दलालाला टाळा, आणि विज्ञानाचा मार्ग धरा. धर्माच्या नावावर पुरोहित गरीबाची पिळवणूक करतात. हे बाबानी सांगितले. (पृ.क्र ६०)[९] अंगात देव आल्याचे सोंग करणाऱ्यांना बाबा चांगलेच फैलावर घ्यावयाचे शकुन पाहणारे अंगार, धुपारे देणारे, ताईत गंडे दोरे बांधणारे यांच्या सावलीत सुध्दा जाता कामा नये. असे बाबा म्हणत. देव ब्राम्हणाच्या, मारवाडयाच्या अंगात येत नाही. मग गरीबांच्या दिन-दलितांच्या अंगात कसा येतो ? आपल्या बायकांच्या अंगात देव आला की, नवरोबाने अशी थोबाडीत मारावी की, एका फटाक्यात घुमारा बंद ! (पृ.क्र.९४)[९] बाबांनी जादूटोणा, मंत्र-तंत्र याचीही खिल्ली उडवित किर्तनातून लोकांना पटवून सांगत मूठ मारुन जर माणसे मरत असतील तर कशाला बंदूका आणि अटमबॉम्ब. वैऱ्याला मारायला मुठ मारा. वैरी मेला म्हणून समजा. (पृ.क्र.७६)[५] बाबांनी मुर्ती पुजेला विरोध केला. अंधश्रध्देला मुठमाती दिली. पोथीनिष्ठ विचारांचा धिक्कार केला. विज्ञाननिष्ठ विचारांचे स्वागत केले. श्रमसंस्कृतीला शिरोधार्थ मानले. मानवसेवेला परमधर्म मानला. त्यांनी पारंपारिक देव कल्पना नाकारली. देवाविषयी आंधळया श्रध्देवर आघात केला. (पृ.क्र.६९)[९]

**गाडगेमहाराजाचे मानवतावादी विषयक विचार :**

जगात माणूस एकटाच येतो. एकटाच जातो. सर्व काही इथेच ठेवतो. मग जगताना तो अमरपट्टा बांधून आल्यासारखा का वागतो ? दंभद्वेष आणि क्रुरपणा का करतो ? साऱ्या माणसाला सुखाने, समाधानाने, स्वास्थाने, शांतीने आणि आनंदाने कसे जगता येईल. पाऊस पडतो म्हणून नदया-नाले वाहतात, तळे-विहिरी भरतात. मेघराज पाऊस देतो आणि माणूस त्याचा मालक होतो. तळयातील पाणी जनावरे पितात. पण माणसाला मनाई केली जाते. पंरतू गाडगेबाबा माणसातल्या माणुसकीला साद घालत होते. माणसात माणूस शोधत होते. (पृ.क्र.१८,१९)[८] प्रत्येक माणसाला सारखेच शारिरिक अवयव आहेत. प्रत्येकाला अन्न लागते. प्रत्येकाचा जन्म आईच्या उदरातून होतो. मग माणसा माणसात फरक का असा प्रश्न बाबांना पडत होता. सर्वजण सारखेच आहेत. सर्वांना सारखेच हक्क व कर्तव्य आहेत. (पृ.क्र६९)[१०] माणसा माणसात शिवाशिव कशासाठी ? समाजातील जाती जमाती माणसाने निर्माण केल्या आहेत. (पृ.क्र६९)[८] आपला देह दुसऱ्याच्या हितासाठी चंदनासारखा झिजावा आपला देह दुसऱ्याच्या उपयोगासाठी जगवला तर त्याचे मुळ अधिक असते त्यामुळे माणसाला माणुसपण येते. देवपण येते (पृ.क्र.०५)[९]

बाबांनी शिक्षण, स्वावलंबन आणि माणुककीचे धडे दिले, लोकांना खरा देवधर्म आणि लोकधर्म शिकविला. दुनिया हेच खरे देवाचे रुप आहे. वासाचे फुल आणून ते दगडी मुर्तीवर वाहण्यापेक्षा चालत्या बोलत्या लोकांच्या मुखात भाकरीचा घास घाला. तर जन्माचे सार्थक होईल. (पृ.क्र.१५३)[८] बाबांनी मानवतावादी विश्वधर्माची प्रतिष्ठापणा केली. अखिल विश्वातील मानव प्राणाची एकच मानव जात , एकच मानवधर्म आाणि एकच मानवतावादी संस्कृतीचे पुरस्कर्ते बनले. (पृ.क्र.५८)[८] गाडगेबाबा म्हणजे लोकशिक्षणाचे चालते बोलते लोक विद्यापीठच होते. "जनी जनार्दन" हे विद्यापीठाचे ब्रीदवाक्य होते. "सेवा" हा विद्यापीठाचा धर्म होता. "निष्काम कर्मयोग" हा विद्यापीठाचा संदेश

होता. "माणसाने माणसासारखे जगावे" हा विद्यापीठाचा संस्कार होता. माणसाला माणून म्हणून जगू देण्याचे तत्वज्ञान सांगणारे हे एक विद्यापीठ होते. (पृ.क्र.१६५)[८]

## निष्कर्ष :

१. गाडगेबाबांनी काम,क्रोध , मोह, लोभ आणि स्वार्थ झुगारुन निसंगपणे जीवन जगले.
२. गाडगेबाबांनी आसक्ती, लालुपतेचा आणि तृष्णेचा त्याग करुन पराकोटीची कठोरता, साधना, जिद्द, संयम, आणि मनोनिग्रहाच्या बळावर वैराग्याची उंच शिखरे गाठली.
३. गाडगेबाबांनी अज्ञानी, अंधश्रध्दा, अनारोग्याच्या अंधारात चाचपडणाऱ्या लोकांमध्ये उजेड निर्माण केला.
४. गाडगेबाबांनी देव, देवसकी आणि देवऋषी यावर तुटून पडून दैववाद थांबविण्यासाठी प्रयत्नवाद रुजविण्याचा प्रयत्न केला.
५. कर्मकांड, अंधश्रध्दा जखडलेल्या मानवास विज्ञानाचे वारे निर्माण करुन विज्ञानातील विचाराची प्रेरणा केली.
६. सामान्य मानवाच्या जीवनात स्वावलंबन व सामर्थ्याचा स्पर्श घडवून आणला.
७. गाडगेबाबांनी किर्तनाच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे खरा मानवतावादी धर्म मांडला.

## संदर्भ ग्रंथ यादी

१. भगत रा.तु. , संत गाडगेमहाराज स्मारक ग्रंथ, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर २००४
२. भिडे गजानन व इतर, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००५
३. पोतदार वसंत, गाडगेबाबा, अक्षर प्रकाशन, मुंबई १९९८
४. कदम विकास, वारकरी संप्रदायाचा इतिहास व पालख्या दिंडयाची परंपरा, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर २०११
५. ठाकरे केशव सिताराम, श्रीसंत गाडगेमहाराज, श्रीगाडगेमहाराज मिशन, नाशिक १९५२
६. कोपर्डेकर शरदचंद्र, संतश्री गाडगेमहाराज
७. भगत रा.तु. , अमृतवाणी, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर १९८३
८. भगत रा.तु., संत गाडगेबाबांची भ्रमणगाथा, कोल्हापूर २००८
९. भगत रा.तु., बोले तैसा चाले, कोल्हापूर २००८
१०. चौगुले / शिंदे सहदेव, रिमा पब्लिकेशन, कोल्हापूर २०१२